# कल्याणजी-आनंदजी - भाग २



नंतर कल्याणजींनी 'पोस्ट बॉक्स ९९९' या चित्रपटातून संगीताचा मौलिक खजिना दिला... 'बिछडे हुए मिलेंगे फिर' (रफी आणि आशा), 'मेरे दिल मे है इक बात' (मन्ना डे आणि लता), 'ओ, नींद ना मुझको आये' (हेमंत आणि लता), 'जोगी आया लेके संदेसा भगवान का' (मन्ना डे), 'अरा र र र र मै तो गिरी रे, गिरी रे' (लता), 'कोई आ जाये, बिगडी तकदीर बना जाये' (लता)... अप्रतिम गाणी ! त्यानंतर, अजूनही एकट्यानेच, कल्याणजींनी १९५९च्या 'बेदर्द जमाना क्या जाने' या चित्रपटात ही गाणी दिली - 'मै यहाँ, तू कहाँ' (लता-रफी), 'क्यू मिले तुम हम) (रफी-लता), 'दूर कही तू चल' (लता-रफी), 'नैना है जादूभरे' (मुकेश), 'कैद मे है बुलबुल, सय्याद मुस्कराये' (लता). भरत व्यास यांची उत्कृष्ट गाणी, उत्तम गायन आणि काय चाली आणि वाद्यवृंद! त्या वर्षी त्यांनी 'चंद्रसेना', 'घर घर की बात' आणि 'ओ तेरा क्या कहना' सारखे काही चित्रपट केले ज्यांचं संगीत लक्षात ठेवण्याजोगं नाही, पण 'मदारी' आणि 'सट्टा बाजार' सारखे चित्रपटही केले ज्यांची गाणी हिट झाली. 'मदारी'तील हिट गाणी : 'दिल लूटनेवाले जादूगर' (लता, मुकेश) व 'प्यार मेरा मजबूर, परदेसी सैय्या' (लता). 'सट्टा बाजार'मधील हिट गाणी: गुलशन बावरा लिखित 'चांदी के चंद टुकडों के लिये' (हेमंतकुमार) व 'तुम्हे याद होगा कभी हम मिले थे' (लता, हेमंतकुमार). ह्या वर्षीपासून कल्याणजींचे भाऊ आनंदजी त्यांच्याबरोबर काम करू लागले व लक्ष्मीकांतनीही त्यांचे सहाय्यक म्हणून काम केले - ह्या वर्षीच्या 'सट्टा बाजार' मध्ये व त्या पुढच्या वर्षीच्या 'छलिया' मध्ये. अर्थात 'छलिया'ने या संगीतकार जोडगोळीला एकदम वरच्या कक्षेत नेऊन बसवले. कारण 'छलिया'त त्यांनी ही गाणी दिली : 'बाजे पायल छुन छुन होके बेकरार' (लता, कोरस), 'छलिया मेरा नाम' (मुकेश), 'डम डम डिगा डिगा' (मुकेश), 'तेरी राहोंमे खडे है' (लता) आणि 'मेरे टूटे हुए दिल से' (मुकेश).

आता त्यांन बरेच चित्रपट मिळाले. 'दिल भी तेरा हम भी तेरे' मध्ये 'मुझको इस रात की तनहाई मे आवाज ना दो' (मुकेश, लता) आणि 'क्या बुरा किया हुजूर मैने ?' (मुकेश); 'प्यासे पंछी' मध्ये -'प्यासे पंछी नील गगन मे' (मुकेश) आणि 'तुम्ही मेरे मित हो' (सुमन, हेमंतकुमार); 'मेहेंदी लगी मेरे हाथ'मध्ये 'मेहेंदी लगी मेरे हाथ रे' (लता), 'तेरी वो चाल है की तौबा' (मुकेश') आणि 'आपने यूँही दिल्लगी की थी' (मुकेश); 'ब्लफ मास्टर'मध्ये 'ऐ दिल अब कही ना जा' (हेमंतकुमार) आणि 'गोविंदा आला रे' (रफी); 'फूल बने अंगारे'मध्ये 'ओ राधा पूँछे तेरी सखियाँ' (लता), 'चाँद आहे भरेगा' (मुकेश),

’संभल तो ले दिल दिवाना’ (लता) आणि ’वतन पे जो फिदा होगा’ (रफी); ’दुल्हा दुल्हन’ मध्ये इंदिवर लिखित ’हमने तुमको प्यार किया है जितना’ (मुकेश/लता) आणि ’जो प्यार तुने मुझको दिया था’ (मुकेश).

’हिमालय की गोद मे’ने त्यांना वरच्या पातळीवरच ठेवले. ह्या चित्रपटातील काही गाणी : ’एक तू ना मिला’ (लता), ’चाँद सी मेहबूबा हो मेरी’ (मुकेश) आणि ’मै तो इक ख्वाब हूँ’ (मुकेश). ’जब जब फूल खिले’ मध्ये ’परदेसियोंसे ना अखियाँ मिलाना’ (रफी), ’ये समा, समा है ये प्यार का’ (लता), ’एक था गुल और एक थी बुलबुल’ (रफी, नंदा) आणि ’यहा मै अजनबी हूँ’ (रफी). कित्येक चित्रपट, कित्येक गाणी, आणि त्यातली कितीतरी गाणी उत्तम ! ’आमने सामने’ मध्ये ’कभी रात दिन हम दूर थे’ (रफी, लता); ’दिल ने पुकारा’ मध्ये ’वक्त करता जो वफा’ (मुकेश); ’उपकार’ मध्ये ’हर खुशी हो वहाँ’ (लता); ’जुआरी’ मध्ये ’हमसफर अब ये सफर कट जायेगा’ (मुकेश, लता), ’सरस्वतीचंद्र’ मध्ये ’हमने अपना सब कुछ खोया प्यार तेरा पाने को’ (मुकेश); ’जॉनी मेरा नाम’ मध्ये ’हुस्न के लाखो रंग’ (आशा, प्रेमनाथ) आणि ’पलभर के लिये कोई हमे प्यार करले’ (किशोर, उषा खन्ना); ’पूरब और पश्चिम’ मध्ये ’कोई जब तुम्हारा ह्रिदय तोड दे’ (मुकेश); ’सफर’ मध्ये ’जिंदगी का सफर’ (किशोर), ’जीवन से भरी तेरी आँखे’ (किशोर) आणि ’हम थे जिनके सहारे’ (लता).

वरील सूचि ही केवळ प्रातिनिधीक आहे, आणि ती सुध्दा कल्याणजी-आनंदजींच्या केवळ १९७० पर्यंतच्या गाण्यांचीच. (हा लेख केवळ १९७० पर्यंतच्या संगीतापर्यंतच मर्यादित आहे). १९७० नंतर जर त्यांनी थोडीशीच चांगली गाणी दिली असती तर तीही या यादीत घातली असती. परंतु १९७० आणि १९८०च्या दशकांतही त्यांनी भरपूर उत्तमोत्तम गाणी दिली. त्यामुळे या लेखात त्यांचा संपूर्ण उल्लेख करता येणार नाही. तरीही जाता जाता, १९७० आणि १९८०च्या दशकांतील त्यांनी संगीत दिलेल्या काही ठळक चित्रपटांची नावं: ’मर्यादा’, ’पारस’, ’व्हिक्टोरिया नं २०३’, ’ब्लॅकमेल’, ’जंजीर’, ’कोरा कागज’, ’धर्मात्मा’, ’डॉन’, ’मुकद्दर का सिकंदर’, ’कुर्बानी’ आणि ’इरादा’. त्यांचा शेवटचा चित्रपट होता १९९४ मधील ’उल्फत की नयी मंझिले’.

**(क्रमशः)**

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still

touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. The author has also recently written another music book called Romancing The Song, which traces the history and changing face of lyrics in HIndi Cinema, right from 1931 till now.

To buy the books, or otherwise write to the author, his email address is
manekpremchand@gmail.com